लोकमत

# 'विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात शिक्षण घेतलेल्या व घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबईतील इंदिरा गांधी विकास संशोधन संस्थेचे ग्रंथपाल डॉ. एस. एम. पुजार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग व ज्ञान स्रोत केंद्रातर्फे भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित डॉ. एस. आर. रंगनाथन स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी निवृत्त ग्रंथपाल डॉ. एस. के. सावनूर, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार प्रमुख उपस्थित होते. डॉ. सावनूर यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जीवनपट श्रोत्यांसमोर मांडला. ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शालिनी लिहीतकर यांनी प्रास्ताविक केले. ज्ञान स्रोत केंद्राचे उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे : डॉ. पुजार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवणे अत्यावश्यक असल्याचे मत 'आयजीआयडीआर' मुंबई संस्थेचे ग्रंथपाल डॉ. एस. एम. पुजार यांनी व्यक्त केले. भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग व ज्ञान स्त्रोत केंद्र यांच्यामार्फत डॉ. एस. आर. रंगनाथन स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार यांनी ग्रंथपालांनी माहिती तंत्रज्ञान व ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील शास्त्रोक्त ज्ञानाचा प्रभावीपणे वापर गरजेचे असल्याचे मत मांडले. निवृत्त ग्रंथपाल डॉ. एस. के. सावनूर यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जीवनपट मांडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. शालिनी आर. लिहितकर यांनी केले. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले.